ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]
Total No. of Questions : 26 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 250-M (NS)**

**Code No. : 250-M (NS)**

# ಡಿ.ಇಡಿ. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ

# D.Ed. SECOND YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಹಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( HPS )
# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 15. 05. 2019 ]
Date : 15. 05. 2019 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

**सामान्य सूचना :** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास अनुकूल व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास अवधी दिलेला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य असे एक उत्तर निवडून लिहा. प्रत्येक प्रश्नाला 1 गुण दिलेला आहे. प्रत्यक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे.

$10 \times 1 = 10$

1. मुल आपले विचार भावना, आवडी-निवडी आपल्या याद्वारे आत्मसात करते.

(अ) खेळाद्वारे (आ) संभाषणाद्वारे

(इ) हावभावाद्वारे (ई) श्रवणाद्वारे.

2. मानवाच्या मानसिक कृतिना, आलोचनाना आकृतीरूप देणे आणि मार्गदर्शन करणे म्हणजे हे होय.

(अ) सामाजिक व्यवस्था (आ) भाषा व्यवस्था

(इ) विचार व्यवस्था (ई) कार्य व्यवस्था.

3. तुमच्या विचारानुसार शाळा ही एक उत्तम अशी ही भाषा वापरण्याचे ठिकाण आहे.
(अ) मराठी भाषा (आ) कन्नड आणि इंग्रजी भाषा
(इ) औपचारिक भाषा (ई) अनौपचारिक भाषा.

4. प्रारंभी मूलाला अध्ययन माध्यम म्हणुन मुलाची मातृभाषा नसल्यास हे होते.
(अ) मुलाचे अध्ययन सुलभ होते (आ) मुलाच्या भाषेचा विकास होतो
(इ) मुलाचा उत्साह वाढतो (ई) मुलाचा उत्साह कमी होतो.

5. भाषेचे कार्य हे आहे. खालील पैकी दिलेल्या अंशाना अनुसरून तुमचा अभिप्राय मांडा.
I. मौखिक आणि लिखित संभाषणासाठी
II. खेळाचे माध्यम
III. सहसंबंध वाढविण्यासाठी
IV. संस्कृती वाहक.

**यापैकी :**
(अ) I आणि II बरोबर (आ) I आणि IV बरोबर
(इ) II आणि III बरोबर (ई) III आणि IV बरोबर.

6. रचनावादी सिद्धांताच्या ( 5E ) पायऱ्यांचा क्रम असा आहे.
(अ) परिशोध, सहभाग, विस्तार, स्पष्टीकरण, मूल्यमापन
(आ) विस्तार, स्पष्टीकरण, परिशोध, सहभाग, मूल्यमापन
(इ) सहभाग, परिशोध, स्पष्टीकरण, विस्तार, मूल्यमापन
(ई) सहभाग, विस्तार, स्पष्टीकरण, परिशोध, मूल्यमापन.

7. घरी मुलाना भाषा आत्मसात करण्याच्या संधी मिळवयाच्या असतोल तर घरातील थोरानी असे वागले पाहीजेत
(अ) नकारात्मक संबंधाने वागले पाहीजेत
(आ) सकारात्मक संबंधाने वागले पाहीजेत
(इ) एकमेकाशी संभाषण न करता वागले पाहीजेत
(ई) एकमेकाशी असहकाराच्या भावनेने वागले पाहीजेत.

8. मौन वाचन म्हणजे हे होय.
(अ) मोठ्या आवाजात वाचन करणे
(आ) पाहुन वाचन करणे
(इ) मुख वाचन करणे
(ई) मनातल्या मनात आवाज न करता वाचन करणे.

9. लेखनात याला अधिक महत्व आहे.
(अ) निबंध लेखनाला (आ) श्रुतलेखनाला
(इ) अनुलेखनाला (ई) हस्ताक्षराला.

10. तुम्ही वर्ग ग्रंथाल्याची स्थापना करताना खालीलपैकी या गोष्टी लक्षात ठेवाल.
I. विद्यार्थ्यांच्या बौद्धीक पातळीनुसार पुस्तकांचे वर्गीकरण
II. पुस्तकाच्या साहित्य प्रकारानुसार आणि भाषेच्या पातळीनुसार वर्गीकरण
III. विद्यार्थ्याच्या नावांची यादी
IV. पुस्तकांच्या नावांची यादी.

**यापैकी :**
(अ) I आणि II बरोबर (आ) II आणि III बरोबर
(इ) II आणि IV बरोबर (ई) III आणि IV बरोबर.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला 2 गुण ) : 5 × 2 = 10

11. मुलाना त्यांचे विचार मांडण्यास उत्तम व्यासपीठ निर्माण करून देण्यात शिक्षकाची भूमिका सांगा.
12. भाषा साहित्याचे प्रकार सांगा.
13. भाषा अध्ययनाचा प्रचलित संदर्भ स्पष्ट करा.
14. तुम्ही रचनावादी सिद्धांता आधारे ( 5E ) भाषा अध्ययन करताना स्पष्टीकरण आणि विस्तार या पायरीत कोणत्या कृती द्याल ?
15. तुम्ही एक भाषा शिक्षक या नात्याने श्रवण ग्रहणाचे मूल्यमापन कसे कराल ?
16. वर्गात चर्चास्पर्धेचे नियोजन कसे करावे ?
17. मौखिक कौशल्याचे मूल्यमापन कसे करावे ?
18. ग्राफिक ऑर्गनायझर ( रेखा संयोजक ) म्हणजे काय ? उदाहरणासह स्पष्ट करा.

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नाला निवड दिलेली आहे. त्यातील कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **5** गुण ) : 8 × 5 = 40

19. अ) भाषा अध्ययन अधिक परिणामकारक होण्यास संपन्मूल्य कसे असावे ?

**किंवा**

आ) भाषा अध्ययन पद्धतीमधील संपूर्ण शारीरिक परिवर्तन पद्धत आणि विषयाधारीत क्रियाधारीत पद्धत स्पष्ट करा.

20. अ) तुम्ही एक वर्गशिक्षक या नात्याने मुलाला त्याच्या घरच्या भाषेतुन शाळेच्या भाषेत रूपांतर करण्यास कशी मदत कराल ? स्पष्ट करा.

**किंवा**

आ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने भाषा अध्ययनाचे मूल्यमापन कसे कराल ?

21. अ) भाषा शिक्षकात आवश्यक असणारी गुणलक्षणे सांगा.

**किंवा**

आ) वर्गात भाषा साहित्याचा वापर करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाल ? तुमचा अभिप्राय मांडा.

22. अ) सहज संदर्भ आणि वर्ग संदर्भ यांचा मौखिक अभिव्यक्तित असणारा फरक स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मौखिक अभिव्यक्ति विकसित करावयाच्या कतीमधोल कथा सांगणे आणि श्रवण किंवा वाचन केलेल्या विषयवस्तुची प्रतिक्रिया व्यक्त करणे या कृती स्पष्ट करा.

23. अ) मौखिक अभिव्यक्ति विकसित करावयाच्या कृतीमधोल मुलाना इतरांच्या संभाषणाचे अनुकरण करून अभिव्यक्त करण्याची कृतीचे आणि प्रश्नोत्तर चर्चा कृतींचे नियोजन तुम्ही कसे कराल ? स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषा ही अध्ययनाला सहायक ठरते ती कशी ? तुमचे विचार मांडा.

24. अ) तुम्ही एक भाषा शिक्षक या नात्याने वाचनाचे मूल्यमापन कसे कराल ?

**किंवा**

आ) वाचन आणि लेखनाचा संबंध स्पष्ट करा.

25. अ) लेखनाच्या अध्ययनाबाबत एन. सी. टी. ई. चे विचार स्पष्ट करा.

**किंवा**

आ) लेखन प्रक्रियेच्या पाच पायऱ्या चे विश्लेषण करा.

26. अ) खालील कवितेचा सारांश लिहा.

**सूर्योदय**

बघ आई आकाशात सूर्य हा आला
पांधरून अंगावर भरजरी शेला
निळ्या त्याच्या महलाला खांब सोनेरी
मोतीयाच्या लावियेल्या आत झालरी
केशराचे घातले हे सडे भूवरी
त्यावरूनी येई त्याची डौलाने स्वारी
डोंगराच्या आडून हा डोकावी हळू
आणि फुले गुलाबाची लागे उधळू
नभातुन सोनीयाच्या ओतीतो राशी
गुदगुल्या करीत तो खेळे फुलाशी
पांखराच्या संगे याची सोबत छान
गाती बघ कशी याला गोड गायन
मंदवारा जागवितो साऱ्या जगाला
म्हणतसे 'उठा उठा मित्र हा आला'

**किंवा**

आ) खालील कथेचे नाटकात रूपातर करा.

**प्रामाणिक कबुतर जोडपे**

कबतराची एक जोडी जुण्या देवदार वृक्षावर रहात होती. दररोज ते मोठ्या मेहनतीने अन्न गोळा करायचे व संध्याकाळी वृक्षाकडे परतायचे. एके दिवसी मादी कबुतर फार दमले व लवकर घरट्याकडे परतले. त्या दिवशी मुसळधार पाऊस पडत होता. एक शिकारी देवदार वृक्षाचा आसरा घेण्यासाठी धावत आला. तो चिंब भिजला होता त्याच्या हातात एक पक्षी पकडण्याचा पिंजरा होता. पिंजऱ्यातील पक्षाला पाहुन मादी कबुतराला दया आली. तिने निट निरखुन पाहीले तर तो पक्षी तिचा पती होता.

तिच्या पतिलाही तिच्याकडे पाहुन खुप दुःख वाटले. पण त्या कबुतर पक्षाने आपल्या पत्नीला धिर दिला. "माझी चिंता करू नकोस. या शिकाऱ्याला मदत कर. तो आपला पावना आहे. त्याचा पाहुनचार कर. तो ओलाचिंब झाला आहे." मादी कबुतराने वाळलेल्या काट्या जमऊन त्याला शेकोटी करून दिली. व त्या शिकाऱ्याला म्हणाली "माझ्याकडे तुम्हाला देता येईल एवढे अन्न नाही. पण या शेकोटीत मला भाजुन तुम्ही खाऊ शकता. तुम्ही जो पकडलेला पक्षी आहे तो माझा पती आहे. त्याच्या वाचुन जगुन मी काय करू ?"

पक्षीनीचे शब्द ऐकूण शिकाऱ्याला दया आलि त्याने. त्या कबुतर पक्षाला जाळ्यातुन मुक्त केले आणि यापुढे कधिही शिकार न करण्याची शपथ घेतली.